**DGP-D310304/6/2024-DESK 31** मुंबई, दि. ३० /०९/२०२४

**संदर्भः**- महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे क्र.संकीर्ण-०७२४/प्र.क्र.१५४/आस्था-१, दि.१६/०७/२०२४

**विषयः**- घरबांधणी अग्रिमावरील व्याजमाफीचे परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत.

******

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या कार्यालयाकडुन **मुख्य लेखाशिर्षाखाली ७६१०००८७ याखाली भापोसे अधिकारी आणि मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच विविध बँकांकडुन / वित्तीय संस्थामार्फत कर्ज घेऊन पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घर बांधणीकरीता अग्रिम उपलब्ध करुन देण्यात येते.** घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांचा शासन सेवेत असतांना दुर्दैवी/ अकाली मृत्यु झाल्यास त्यांच्याकडील मुद्दलावरील व्याजाची रक्कम शासनाच्या मान्यतेने माफ केली जाते. त्यासाठी शासनास प्रस्ताव सादर केले जातात. परंतु सदर प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटीमुळे मान्यता देण्यास विलंब होतो. अशा प्रकारचा विलंब होऊ नये याकरीता उक्त प्रस्ताव सादर करताना प्रस्तावामध्ये नमूद करावयाची माहिती व त्याबाबत सर्व संबंधीत कागदपत्रे सादर करणेची दक्षता घेणेबाबत शासनाने त्यांचे संदर्भांधीन दि.१६/०७/२०२४ च्या परिपत्रकान्वये सर्व घटक प्रमुखांना सुचित केले आहे. **(**सोबत प्रत जोडली आहे.**)**

तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, संबंधीत घटकातील मयत पोलीस अधिकारी/ अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांचे घरबांधणी अग्रिमावरील व्याजमाफीचे सविस्तर प्रस्ताव सादर करताना सदर शासन परिपत्रकानुसार संपूर्ण माहिती व संबंधीत कागदपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाच्या मार्फतीने शासनास सादर करावेत, ही विनंती. तसेच जे प्रस्ताव यापूर्वी शासनास सादर करण्यात आले आहेत व त्यांचे मंजूरी आदेश अद्याप प्राप्त झालेले नाहीत. त्या प्रस्तावा सोबत वरील माहिती/ कागदपत्रे सादर केली नसल्यास ती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

अनिता ३०।९।२४

(अनिता राठोड)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक(लेखा) (अति.कार्य.)
पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह)(बृहन्मुंबई वगळून)

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/ राज्य राखीव पोलीस बल, मुंबई/ वाहतुक मुंबई/ फोर्सवन मुंबई/ आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, मुंबई/ नागरी हक्क संरक्षण विभाग, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ बिनतारी संदेश विभाग, पुणे / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई/ मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान/राज्य राखीव पोलीस बल, नागपूर/पुणे

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक

अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/ पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे

सर्व पोलीस अधीक्षक, (गुन्हे/ बिनतांरी सदेश/ लोहमार्ग सह)

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, (रारापोबल सह )/अ.अ.प्र.के., नागपूर/ UCTC-मुंबई/पुणे

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९/ राज्य अपत्ती प्रतीसाद दल,धुळे/ नागपूर

सर्व अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग,

नवीन प्रशासन भवन, १२ वा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क. २२०२८१६६ Email ID: home_hdo1@maharashtra.gov.in

क्रमांक : संकीर्ण-०७२४/प्र.क्र.१५४/आस्था-१ दिनांक - १६ जुलै, २०२४.

प्रति,

सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस आयुक्त (रेल्वेसह) / पोलीस अधीक्षक.

**विषय :- घरबांधणी अग्रीमावरील व्याजमाफीचे परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत.**

महोदय,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना मुख्य लेखाशीर्षाखाली ७६१०००८७ याखाली अधिकारी / कर्मचारी यांना तसेच विविध बँकांकडून / वित्तीय संस्थांमार्फत कर्ज घेऊन पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांना घरबांधणीकरीता अग्रीम उपलब्ध करुन देण्यात येते. घरबांधणी अग्रीम घेतलेल्या पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांचा शासन सेवेत असतांना दुर्दैवी / अकाली मृत्यु झाल्यास त्यांच्याकडील व्याजाची रक्कम शासनाच्या मान्यतेने माफ केली जाते. त्यासाठी प्रस्ताव विविध पोलीस घटकांकडून शासनास प्राप्त होत असतात.

परंतु सदर प्रस्तावांमध्ये असलेल्या त्रुटींमुळे मान्यता देण्यास विलंब होतो. अशा प्रकारचा विलंब होऊ नये यासाठी उक्त प्रस्ताव सादर करतांना खालील मुद्यांची सविस्तर माहिती व सर्वसंबंधित कागदपत्रे प्रस्तावासोबत दाखल केली आहेत याची दक्षता घेण्यात यावी :-

१) संबंधित दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवेचा तपशील (नियुक्तीचा दिनांक व नियुक्तीचा प्रकार व झालेला एकूण सेवा कालावधी)

२) दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेत स्थायीत्व प्रमाणपत्र दिले होते किंवा कसे.

३) दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या योजनेतून घरबांधणी अग्रीम मंजूर करण्यात आले आहे ते स्पष्ट नमूद करावे. (बँकेमार्फत कर्ज घेऊन किंवा मुख्यलेखाशीर्ष ७६१०००८७ यापैकी कोणत्या योजनेतून)

४) दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून / त्यांच्या वारसांकडून मुद्दलाची पूर्ण रक्कम वसूल झाल्यासंदर्भातील सविस्तर माहिती व त्याबाबतचा कागदपत्रांच्या प्रती (मुद्दलाची रक्कम शासन जमा केल्याबाबतच्या पावतीची प्रत).

५) दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांचे मृत्यु प्रमाणपत्र.

६) दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मंजूर केलेल्या आदेशाची प्रत व वितरीत केलेल्या आदेशाची प्रत.

७) व्याजाच्या परिगणनेची कार्यालय प्रमुख्यांनी प्रमाणित केलेली प्रत.

८) संबंधित दिवंगत पोलीस अधिकारी / अंमलदार / अधिकारी / कर्मचारी यांना सक्तीने सेवानिवृत्त / बडतर्फ / सेवेतून कमी करणे अशा प्रकारची शिक्षा केले नसल्याबाबतचे कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.

वरील बाबींची पुर्तता करुन सदरचे प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यामार्फतच सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( मुं. उ. भरोसे )
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रत, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.